http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# मनोज जरांगे पाटलांचे शिवराळ भाषेत बोलणे हे छत्रपती शिवरायांचे संस्कार अन् मराठा समाजाची संस्कृती नाही!!

ज्या माता भगिनींनी मराठा आरक्षणासाठी 58 मूक मोर्चांचे नेतृत्व करून जगाला आदर्श घालून दिला त्यांचा अपमान करू नका!!

ज्या समाजाचे मनोज जरांगे नेतृत्व करताहेत तो समाज अत्यंत सुसंस्कृत, समंजस असल्याने शिवराळ भाषा त्यांना शोभा देत नाही!!

आपल्या वक्तव्यामधून समाजाची पत जाऊ नये, अप्रतिष्ठा होऊ नये याची मनोज जरांगे पाटलांनी काळजी घ्यावी!!

## आपल्या समाजाची अप्रतिष्ठा होऊ नये याची जाणीव ठेवणे जरांगे यांचे कर्तव्य!

**मुंबई :** मराठा समाजाचे नेतृत्व करत असताना ही भाषा सुसंस्कृत आणि समंजस असलेल्या मराठा समाजला शोभणारी नाही, हे लक्षात घ्यावे म्हणून जरांगे यांच्या भाषेने मराठा समाजाची अप्रतिष्ठा होत आहे. मराठा समाजाची ही भाषा नव्हे. त्यामुळे आरक्षणाचा हा लढा मनोज जरांगे यांनी खालच्या पातळीला आणू नये, असे खडे बोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते सचिन सावंत यांनी सुनावले असतानाच मनोज जरांगे यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याबद्दल जी भाषा वापरली ती अत्यंत निषेधार्ह असल्याचेही म्हटले आहे.



### न्याय देण्याच्या संघर्षाचा लढा इतक्या खालच्या पातळीला घेऊन जाऊ नका!

काँग्रेस पक्ष संविधान व संविधानिक मर्यादा मानतो. एवढेच नव्हे तर काँग्रेस पक्ष सर्वसामान्यांचा व सर्वांचा पक्ष आहे तो कोणत्याही विशिष्ट जाती धर्माचा नाही. कोणावरही अन्याय होता कामा नये, हीच काँग्रेस पक्षाची भूमिका आहे. काँग्रेसच्या शब्दकोशात जुमलेबाजी, जनतेची फसणूक, खोटे जीआर, गॅझेटच्या नावाने शब्दच्छल हे प्रकार नसतात. जे करायचे ते प्रामाणिकपणे जनसेवेसाठी आणि संविधानाच्या चौकटीत करण्याची धारणा आहे, असेही सचिन सावंत यांनी सांगितले.

### संविधानिक चौकटीत, संस्कृतीच्या परिघात, सुसंस्कृतपणाच्या मर्यादित टिका असावी!



प्रत्येकाला राजकीय पक्षांवर व नेत्यांवर टीका करण्याचा अधिकार आहे आणि त्या टीकेला उत्तर देण्याचाही अधिकार आहे. परंतु, ही टीका संविधानिक चौकटीत, संस्कृतीच्या परिघात आणि सुसंस्कृतपणाच्या मर्यादेत असावी. मराठा समाजाच्या माय भगिनींनी आपल्या 58 विराट मूक मोर्चाने केवळ देशालाच नव्हे तर जगाला आदर्श घालून दिला. त्या आदर्शाची आठवण प्रत्येकाला असली पाहिजे. आरक्षणाचा लढा लढताना केवळ आरक्षण मिळवून देणे नव्हे तर समाजाला आदर्श घालून देणे ही जबाबदारी ही नेत्यांची असते. समाजाची प्रतिमा वाईट होता कामा नये, याची काळजी घेतली पाहिजे. त्यातही सर्व मोर्चे आणि हा लढा यापूर्वी राजकीय नव्हता त्यामुळे माझ्यासहित काँग्रेस पक्षाच्या अनेक नेत्यांनी या मोर्चामध्ये सहभाग घेतला पण आता मात्र मनोज जरांगे यांच्या वक्तव्यांना राजकीय वास येत आहे.

### राहुल गांधी यांच्यावरील टीका निषेधार्ह!

● मनोज जरांगे यांनी राहुल गांधी व काँग्रेस पक्षावर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना सचिन सावंत म्हणाले की, मनोज जरांगे यांनी राहुल गांधी यांच्याबद्दल खालच्या दर्जाची भाषा वापरली असली तरी राहुल गांधी यांनीच जातीय जनगणनेसाठी रान पेटवले आहे आणि काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यानंतर आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्दा हटवली जाईल, असे ठणकावून सांगितले आहे.

● कोणत्याही जातीय संघर्षाशिवाय व कोणालाही न दुखवता मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग, हा याच 50 टक्क्यांची मर्यादा हटवण्याचा राहुल गांधी यांच्या निर्धारातून सुकर होईल. काँग्रेस पक्षाने सुरुवातीपासूनच कोणावरही अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

## अभिजात मराठी भाषेमुळे सांस्कृतिक वारशांचे जतन होईल : प्रा. चाटे

### घाटशिळा महाविद्यालयात 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' उत्साहात





**बीड : प्रतिनिधी**

"मराठी भाषेला गौरवशाली परंपरा आहे; किंबहुना मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी आणि भाषेचे संवर्धन होण्यासाठी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दिलेला दर्जा ही अत्यंत अभिमानास्पद आणि गौरवशाली बाब आहे!" असे प्रतिपादन मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. बिभिषण चाटे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने ३ ते ९ ऑक्टोबर-2025 या कालावधीत अभिजात भाषा दिवस आणि अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे आयोजन विविध उपक्रमांनी उत्साहात संपन्न होत आहे. यावेळी प्रा. चाटे मार्गदर्शक बोलत होते. ● पान ३ वर...

## पैठण तालुक्यात दारू बंदी अधिकाऱ्यांच्या हप्ते खोरीमुळे अवैध्य दारू आड्डयात वाढ?

भाग 1

### राज्य उत्पादन शुल्क विभागातील काही अधिकाऱ्यांच्या हप्तेखोरीला आळा घलण्याची गरज!!

**पैठण : सर्जेराव खडसन**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या काही अधिकाऱ्यांना हप्ते खोरी या लागलेल्या वाळवीमुळे ठिकठिकाणी खुलेआम अवैध दारूचे अड्डे चालू असल्याची सर्वत्र चर्चा होत असल्याने अधिकाऱ्यांच्या या हप्ते खोरीला वरिष्ठ पातळीवरील एखाद्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांकडून जोपर्यंत आळा बसत नाही तो पर्यंत तालुक्यात मागील काही वर्षांपासून जागोजागी बोकाळलेले हे अवैध्य दारूचे अड्डे बंद होणार नाही अशी चर्चा तालुक्यातीलसुज्ञ नागरिकांत होत आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दारू बंदी अधिकाऱ्यांचा तालुक्यातील अवैध्य दारू विक्री करणाऱ्यांना असलेला छुपा आशीर्वाद व या आशीर्वादाचा बदल्यात मिळणाऱ्या हप्त्यांमुळे विना परवाना मुख्य रस्त्यावर असणारे धाबे, चहा पाण्याचे हॉटेल, आठवडी बाजार तळ, गाव, तांडे, शेत वस्त्यांवर कोठे ही राजरोसपणे अवैध देशी दारूची विक्री होत आसल्याने तालुक्यात जनु एक प्रकारे दारूचा महापूर आलेला दिसत आहे. त्यातच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे काही दारू बंदी अधिकारी वरकमाई करण्यात मश्गूल असल्याने झटपट व जादा पैसे कमावण्याच्या नादात तालुक्यातील काही गुंड प्रवृत्तीच्या व गाव पातळी वरील राजकीय पुढाऱ्यांच्या चेल्या चपाट्यात अवैध दारू विक्री करण्याची जणु स्पर्धाच लागली आहे. परंतु या ठिकठिकाणी बोकाळलेल्या दारूच्या अड्डयामुळे अनेकांचे सुखी संसाराची राखरांगोळी होतांना उघड्या डोळ्यांनी पाहून त्यांनी फक्त महिन्याच्या महिन्याला यायचे अन् आपल्या खास पंटर ● पान ३ वर...

## भाजयुमोचे प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव यांची अ‍ॅड. राहुलकुमार राका यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



**गेवराई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव यांनी भारतीय जनता पार्टीचे संस्थापक सदस्य तथा महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष व दी वैद्यनाथ बँकेचे सल्लागार, दैनिक 'बीड वास्तव' चे उपसंपादक नोटरी ॲड राहुलकुमार राका यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली व सामाजिक राजकीय व सांस्कृतिक सध्याच्या पूर परिस्थितीवर व विविध विषयावर चर्चा केली तसेच भारतीय जनता पार्टी पक्ष वाढीसाठी एक दिलाने काम करू असेही विचार व्यक्त केले यावेळी भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव यांचा राम लल्ला फ्रेम, मोत्याची माळ शाल श्रीफळ देऊन भाजपाचे संस्थापक सदस्य महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष व दी वैद्यनाथ बँक सल्लागार, दैनिक बीड वास्तव चे उपसंपादक नोटरी ॲड राहुलकुमार राका यांनी निवासस्थानी भेट दिली असता सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस दोघांनी पण एकमेकास शुभेच्छा दिल्या यावेळी टाकळगाव चे ऋषिकेश गव्हाणे यावेळी उपस्थित होते.

### खंडाळ्यातील शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा!

### अहवाल कधी पाठवणार आणि नुकसानभरपाई कधी मिळणार : डॉ. गणेश ढवळे

## जिल्हाधिकारी साहेबांनी चाड्यावर मुठ धरून पेरलेले सोयाबीन पावसात वाहून गेले!

**बीड : प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील खंडाळा येथील शेतकरी बाबासाहेब चिंतामण जायभाये यांच्या शेतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वत: चाड्यावर मुठ धरत "सोयाबीन"ची पेरणी केली होती. त्या वेळी जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं असल्याचा दिलासा दिला, आणि त्या कृतीचं सर्वत्र कौतुकही झालं.

मात्र, काही महिन्यांतच परिस्थिती उलटी झाली आहे. अतिवृष्टीमुळे खंडाळा परिसरातील सुमारे ५०० एकर जमीन नापिक झाली आहे. पिक पूर्णत: उद्ध्वस्त झालं असून पुढचं पिक घेण्याचीही शक्यता नाही, अशी शेतकऱ्यांची हतबल अवस्था आहे.

"सरकार शेतकऱ्यांच्या सोबत असल्याचं म्हणतंय, पण प्रत्यक्षात मदतीचा एक रुपयाही शेतकऱ्यांच्या हातात पडलेला नाही. पंचनामेच पूर्ण झालेले नाहीत, मग दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई मिळणार कशी?" असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला.

### ६ लाख हेक्टरपेक्षा अधिक शेतीचे नुकसान – पण अजूनही पंचनामे प्रलंबित!

● जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १४ जून रोजी खंडाळा येथे प्रत्यक्ष पेरणी केली होती. त्यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. मात्र आता तेच शेतकरी प्रशासनाच्या दारात फिरत आहेत. बीड जिल्ह्यातील प्राथमिक अंदाजानुसार तब्बल ६ लाख हेक्टरहून अधिक शेतीचे नुकसान झालं आहे. शासनाने दिवाळीपूर्वी मदत देण्याची घोषणा केली असली, तरी महसूल विभागाच्या टाळाटाळीमुळे ती शक्य दिसत नाही. "कागदोपत्री दिलासा देणं थांबवा; शेतकऱ्यांच्या पदरात प्रत्यक्ष मदत कधी पडणार?" असा जळजळीत प्रश्न डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.





## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# विश्वशांतीसाठी ऐतिहासिक सामूहिक भक्तामर स्तोत्र

## ● ९ ऑक्टोबर २०२५: जाबिंदा ग्राउंडवर 'श्री भक्तामर दिवस' सोहळ्याची जय्यत तयारी







➤ **छत्रपती संभाजीनगर :** जैन धर्माचे महामंगलकारी स्तोत्र असलेल्या 'श्री भक्तामर स्तोत्रा' चा जागतिक स्तरावर प्रचार करण्यासाठी आणि संपूर्ण विश्वात शांती, सलोखा स्थापित करण्याच्या उद्देशाने, गुरुवार, ९ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे एका ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी, आंतरराष्ट्रीय स्तरावर 'श्री भक्तामर दिवस' म्हणून साजरा करण्याचा संकल्प आंतरराष्ट्रीय श्री भक्तामर प्रभावना संघ, सकल जैन समाज भारत ने केला आहे. बीड बायपास रोड, शाहनूर मियाँ दर्गा पुलाजवळ असलेल्या जाबिंदा ग्राउंडवर उभारण्यात आलेल्या भव्य, वॉटरप्रूफ 'श्री भक्तामर देशना मंडपात' हा सोहळा पार पडेल. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सकल जैन समाज बंधू-भगिनींनी या सामूहिक स्तोत्र पठण सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन जैन समाजाची एकता दर्शवावी, असे विनम्र आवाहन आयोजकांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या चातुर्मासानिमित्त सकल जैन समाजातर्फे विविध ठिकाणी विराजमान असलेल्या सर्व पूज्य साधू-संतांना निमंत्रण देण्यात आले आहे. यात परमपूज्य श्री डॉ. प्रणाम सागरजी गुरुदेव ससंघ, परमपूज्य जनसंत उपाध्याय श्री विरंजन सागरजी गुरुदेव ससंघ, आणि परमपूज्य चर्या शिरोमणि श्री प्रभाव सागरजी महाराज यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, बजाजनगर येथे विराजित असलेल्या पूज्य आर्यिका विपुलमती माताजी ससंघ तसेच श्रमणसंघीय उपप्रवर्तनी ओजस्वी वक्ता परम पूज्य श्री सुमनप्रभाजी म.सा. आदी ७, जिनशासन प्रभाविका परम पूज्य श्री प्रविणाजी म.सा. आदी ६, मधुर व्याख्यानी परम पूज्य श्री आराधनाश्रीजी म.सा. आदी २, परमपूज्य साध्वीवर्या श्री विरतीप्रभाश्रीजी म.सा. आदी ४, आणि पुनीतप्रज्ञाश्रीजी म.सा. आदी ३ या सर्व साधू आणि साध्वींना जैन समाजाने आदराने निमंत्रण दिले आहे.

भक्तामर स्तोत्र हे आचार्य मानतुंग यांनी भगवान आदिनाथ (पहिले तीर्थंकर) यांच्या स्तुतीसाठी रचले आहे. हे केवळ एक स्तोत्र नसून ते शक्ति, भक्ती आणि मुक्ती चा संगम आहे. या स्तोत्राच्या प्रत्येक काव्यात (श्लोकात) विशेष मंत्रशक्ती दडलेली असून, नित्य पठणाने अनेकांचे रोग, शोक, भय आणि पीडा दूर होतात, अशी श्रद्धा आहे. हे स्तोत्र कुटुंबात सुख, शांती, समृद्धी आणि वैभव आणते, तसेच याच्या श्रवण-पठणाने आत्मिक शांती आणि बौद्धिक विकास देखील साधला जातो.

आंतरराष्ट्रीय 'श्री भक्तामर दिवस' संकल्पात 'भक्तामर वाले बाबा' म्हणून ओळखले जाणारे आचार्य डॉ. प्रणामसागरजी महाराज यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभले आहेत. आचार्यश्रींनी आपल्या प्रभावी वाणी आणि साहित्याच्या माध्यमातून भक्तामर स्तोत्राचे सामर्थ्य जगभर पोहोचवले आहे. त्यांच्या प्रेरणेतूनच ९ ऑक्टोबर रोजी सामूहिक पठण करण्याचा हा संकल्प विश्वव्यापी झाला आहे. भारतासह ब्रिटन, अमेरिका, दुबई, कुवैत, जर्मन, जपान, साऊथ आफ्रिका अशा अनेक देशांतून भाविक ऑनलाइन माध्यमातून या सोहळ्यात सहभागी होणार आहेत, तसेच ४८ आचार्य भगवंत ऑनलाइन जोडले जाऊन स्तोत्रातील एकेक काव्य पठन करणार आहेत. भारतीय इतिहासात असा योग प्रथमच जुळून येत आहे, हे या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य आहे.

या सोहळ्याच्या तयारीसाठी खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर अंतर्गत सर्व जिनालये, सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर आणि श्री भक्तामर प्रभावना रजत वर्षायोग समिती यांनी जय्यत तयारी केली आहे. कार्यक्रमाचा भव्य शुभारंभ सकाळी ठीक ७:०० वाजता होणार आहे. जाबिंदा ग्राउंडवरील या विशाल वॉटरप्रूफ देशना मंडपात २५,००० हून अधिक भाविक आणि समाज बांधवांच्या बसण्याची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे उपस्थितीचा हा आकडा एका ऐतिहासिक विक्रमाची नोंद करेल.

या समारंभाचा मुख्य भाग म्हणजे सकाळी ठीक ९ वाजून ९ मिनिटे आणि ९ सेकंदांनी (९:०९:०९) होणारे सामूहिक स्तोत्र पठण. एकाच वेळी, एकाच स्वरात या मंगलकारी स्तोत्राचे पठण करून विश्वशांतीचा शंखनाद करण्यात येणार आहे.

भक्तामर दिवसाचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी ९ ऑक्टोबर रोजी आचार्य डॉ. प्रणाम सागरजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत एक मंगलमय धर्मयात्रा निघणार आहे. सकाळी ६:०० वाजता अरिहंत नगरच्या श्री युग प्रवर्तक आदिनाथ मंदिरातून सुरू होणारी ही रॅली, आचार्यश्रींच्या आशीर्वादाने परिसरातील सर्व मंदिरांना स्पर्श करेल. ही भक्तीपूर्ण यात्रा रोपळेकर चौक आणि शहानुरवाडी दर्गा मार्गे वाटचाल करत ठीक ७:०० वाजता जाबिंदा मैदानावर उपस्थित होईल. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

सोहळ्याची सुरुवात सकाळी ७:०० वाजता संगीत आणि स्वागत नृत्याच्या तालावर मंगलाचरण करून होईल. यानंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये चातुर्मास करणाऱ्या सकळ जैन समाजाच्या सर्व साधू-साध्वी भगवंतांचा मंगलमय उपदेश भाविकांना प्राप्त होईल. समारंभात महाराष्ट्रातील प्रसिद्ध संगीत समूह आपल्या सुमधुर संगीताने वातावरण अधिक भक्तीमय करेल. या संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्र संचालनाची जबाबदारी देशातील सुप्रसिद्ध, जैन धर्माचे सखोल ज्ञान असलेल्या आणि २००० हून अधिक कार्यक्रमांना आपल्या शब्दसंपदेने मंत्रमुग्ध करणाऱ्या, मुंबईच्या आर. जे. विधी जैन या सांभाळणार आहेत. तसेच, अनेक राजकारणी आणि विविध सामाजिक, संस्था-संघटनांचे पदाधिकारी यांची सन्माननीय उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे. सामूहिक पठणानंतर प्रमुख अतिथींचे उद्‌बोधन होईल आणि सकाळी ठीक १०:३० वाजता सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता होईल. उपस्थितांसाठी कार्यक्रमस्थळी जलपान आणि महाप्रसादीची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय श्री भक्तामर प्रभावना संघातर्फे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रत्येक जैन कुटुंबाला 'जैन समाजाची एकता' आणि 'हर घर भक्तामर, घर घर भक्तामर' हा संकल्प पूर्ण करण्यासाठी ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ठीक ७:०० वाजता जाबिंदा ग्राउंडवर उपस्थित राहण्याची नम्र विनंती करण्यात आली आहे. तसेच, देश-विदेशातील सर्व समाज बांधवांनी आपापल्या मंदिर, स्थानक, उपाश्रयांमध्ये या सामूहिक भक्तामर पठण सोहळ्याचे आयोजन करावे, असेही आवाहन आयोजन समितितर्फे करण्यात आले आहे

# देशमुख नगर जैन मंदिरात उपनयन संस्कार महामहोत्सव सपन्न

## ● मुलांचे भविष्य घडवणं हे तुमच्या हातात आहे -उपाध्यायश्री विरंजन सागर जी महाराज







➤ **छत्रपती संभाजीनगर :** उपाध्यायश्री विरंजन सागर जी महाराज यांच्या हस्ते श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर, देशमुख नगर येथे उपनयन संस्कार महामहोत्सव पार पडला, ज्यामध्ये ५०० मुलांचे उपनयन संस्कार करण्यात आले. मुनिश्रींनी सर्व मुलांच्या कपाळावर स्वस्तिक काढून त्यांना मंगल आशीर्वाद दिले. तसेच गर्भवती महिलांचेही विशेष संस्कार करण्यात आले.

सभा संबोधित करताना मुनिश्रींनी सांगितले: "मुलांच्या मोहात अंध धृतराष्ट्र होऊ नका, अन्यथा दुर्योधन आणि दु:शासनासारख्या संततींचा सामना करावा लागेल.

मुलांना चांगले संस्कार द्या, ते साधू-संतांच्या संगतीत वाढले पाहिजेत. मुलांचं मन एखाद्या फिल्म कॅमेऱ्यासारखं असतं, ते नेमकं तेच परत दाखवतं जे त्यांच्या डोळ्यांसमोर साठवलं गेलं असतं." "म्हणून त्यांच्या समोर कधीही शिवीगाळ, फसवणूक किंवा लोभाची भाषा करू नका, अन्यथा त्यांच्या अश्लील वागणुकीसाठी तुम्हीच जबाबदार असाल." "उत्तम आई-वडील ते नाहीत जे मुलांना संपत्तीची वारसा देतात, तर जे त्यांना



उत्तम संस्कार देतात तेच खरे पालक!"

"मुलांना शिकवा, घडवा, पण इतकेही नाही की ते तुमच्याच विरुद्ध उभे राहतील. त्यांना भेटवस्तू द्या, पण त्याआधी संस्कार द्या. भेट न दिल्यास ते फक्त दोन तास रडतील, पण संस्कार न दिल्यास आयुष्यभर रडतील!" "जर पाषाणातही योग्य संस्कार घडवले गेले, तर तो भगवान बनतो. तसंच माणसातही योग्य संस्कार दिल्यास तो पूज्य होतो." "म्हणूनच आपल्या मुलांना उत्तम संस्कार देऊन एक चांगलं, माणूसकीनं भरलेलं जीवन द्या — हे प्रत्येक आई-वडिलांचं कर्तव्य आहे."

"८ वर्षांहून मोठ्या मुलांना गुरुकडे घेऊन जा आणि त्यांना धर्म, नीती, आणि संयमाचे संस्कार द्या." "मुलांना समजावताना मुनिश्रींनी सांगितले की जीवनात कधीही वाईट सवयी अंगीकारू नका — यामध्ये मद्यपान, मांसाहार, आणि मध सेवन यांचा त्याग करावा."

पावन दिवशी मुनिश्रींनी सांगितले की श्रीरामांनी असत्यावर विजय मिळवून सत्याचं रक्षण केलं. "रावणाचा पुतळा जाळण्याआधी, आपल्या आत बसलेल्या हजारो रावणांना जाळा. जी दृष्टी वारंवार अध:दृष्टीकडे जाते, त्यागा त्या वाईट सवयी!" सभेची सुरुवात सागर येथून आलेले पंडित उदयचंद शास्त्री यांनी मंगलाचरण करून केली.

# 'लाडक्या बहिणी' भडकल्या! कारण काय?

मुंबई : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी बंधनकारक केले आहे. लाडकी बहीण योजनेतून अपात्र महिलांना वगळण्यासाठी शासनाने अनेक चाळण्या लावल्या आहेत. त्यानुसार आता प्रत्येक लाभार्थी महिलेने केवायसी करायची आहे. त्यासाठी लाभार्थ्यांसोबत पती किंवा वडिलांचीही ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याद्वारे महिला लाभार्थ्यासोबत तिचा पती किंवा वडिलांचेही वार्षिक उत्पन्न शोधले जाणार आहे.

लाभार्थी महिलेच्या उत्पन्नासह वडील किंवा पतीचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त असल्यास तिला लाभासाठी अपात्र ठरवले जाणार आहे. योजनेची सुरुवात झाल्यापासून नियमितपणे महिलांना लाडकी बहीण योजनेचे हप्ते मिळत आहेत. सरकारवर आर्थिक बोजा वाढल्याने विविध नियम लावून लाभार्थ्यांच्या संख्या कमी करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे.

यासाठी योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी बंधनकारक केले आहे. तसेच दोन महिन्यांत ही प्रक्रिया केली नाही, तर योजनेचा लाभ बंद होणार आहे.

पण अनेक महिलांना केवायसीमध्ये तांत्रिक अडथळे येत असल्याचा अनुभव आहे. सर्व्हर ठप्प होत असल्याची व ओटीपी मिळत नसल्याची समस्या महिलांना



भेडसावत आहे. यामुळे 'लाडक्या बहिणी' भडकल्या आहेत. केवायसी करताना 'लाडक्या बहिणींना ओटीपी येत नाही. यामुळे सेतू केंद्रांवर गर्दी वाढली आहे. तासनतास रांगेत थांबूनही कामं होत नसल्याने महिलांचा संताप अनावर झाल्याचे दिसून येते.

### मुदतवाढ मिळणार?

ऑक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यांत केवायसी करता येणार आहे. मात्र केवायसी करण्यात अडचणी येत असल्याने मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे. केवायसीवेळी ओटीपी मिळत नसल्याच्या समस्येची दखल महिला व बालविकास विभागाने घेतली आहे.

तज्ज्ञांच्या माध्यमातून याबाबत उपाययोजना करण्याचे काम प्रगतिपथावर आहे, असा खुलासा या विभागाने केला आहे. त्यामुळे येत्या आठवडाभरात पोर्टल सुरळीत सुरू होईल, अशी अपेक्षा आहे.

### ...अशी आहे योजनेची केवायसी प्रक्रिया

https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जावे लागेल. पोर्टलवर नाव, पत्ता, शिधापत्रिका क्रमांक, आधार क्रमांक, उत्पन्नाची माहिती द्यावी लागेल. 'कॅप्चा' नोंदविल्यानंतर सहमती दर्शवावी लागेल. त्यानंतर ओटीपी येतो. मात्र, सर्वर काम करीत नसल्याने ओटीपी येणे बंद झाले आहे.

सांजदैनिक बीड · वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# भाजपात महिला शक्तीचा भव्य प्रवेश !

## कन्नड शहरात ऐतिहासिक पक्षप्रवेश सोहळा संपन्न

➤ कन्नड : विशाल भालेराव

भारतीय जनता पक्षाच्या वतीने दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी कन्नड शहरात आयोजित करण्यात आलेल्या महिला पक्षप्रवेश सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या भव्य कार्यक्रमात अनेक महिलांनी भाजपमध्ये विश्वास ठेवत पक्षप्रवेश केला आणि भाजपच्या 'सबका साथ, सबका विकास' या ध्येयधोरणाशी बांधिलकी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे आयोजन शिक्षक पतसंस्था, पीशोर नाका जवळील भाजपा कार्यालय, कन्नड येथे करण्यात आले होते. कार्यक्रम दुपारी १ वाजता सुरू झाला आणि परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या पक्षप्रवेश सोहळ्यास भाजपचे जिल्हाध्यक्ष संजयजी खंबायते, डॉ. संजय गव्हाणे, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी सदस्य, भाजप नेते मनोज केशवराव पवार, तसेच सुनीलभाऊ पवार, मध्य तालुकाध्यक्ष, कन्नड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमामध्ये भाजप नेते श्री. मनोज पवार यांनी महिलांच्या राजकारणातील सहभागाचे महत्त्व अधोरेखित करत, त्यांना भाजपच्या विचारधारेची सखोल माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाने महिलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. यावेळी जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनीही महिलांच्या प्रवेशाचे स्वागत करत, भाजपचा सामाजिक बांधिलकीचा दृष्टिकोन विशद केला. "भाजप हा केवळ एक राजकीय पक्ष नसून, राष्ट्रहितासाठी झटणारे एक व्यापक कुटुंब आहे" असे ते म्हणाले. या कार्यक्रमात कन्नड शहर व परिसरातील शेकडो महिलांनी भाजपा कुटुंबात प्रवेश केला. सर्व नवप्रवेशित महिलांना पक्षाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपा परिवारातील विविध पदाधिकारी, मंडळाध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, सचिव, आजी-माजी पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन सुरळीतपणे पार पाडण्यात आले आणि संपूर्ण वातावरणात उत्सवाची छटा अनुभवायला मिळाली.

# श्रीक्षेत्र सांगवी पाटण येथे जयवंत महाराज बोधले यांच्या कीर्तनाने भाविक झाले धन्य

## ➤ संत तुकारामांच्या अभंगातून 'शरणागती' चा संदेश

➤ आष्टी : प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण, जे आता 'श्री क्षेत्र' म्हणून ओळखले जात आहे, तेथे सुरू असलेल्या सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचा पाचवा दिवस (दि. ६ ऑक्टोबर २०२५) हा भाविकांसाठी अत्यंत कृतिक्तिवंत ठरला. या संध्याकाळी पंढरपूरहून पधारलेल्या ह.भ.प. विनोदाचार्य जयवंत महाराज बोधले यांनी केलेल्या कीर्तन सेवेने संपूर्ण वातावरण भक्तिरसाने ओतप्रोत भरले.

महाराजांनी कीर्तनाद्वारे संत तुकाराम महाराजांचा ओघवत्या आवाजात मूळ अभंग सादर करून त्याचा सखोल अर्थ सांगितला. 'उत्तम त्या याती ! देवा शरण अनन्यगति !!' या ओळीतूनच त्यांनी सांगितले, की देवाच्या चरणी पूर्णत: शरण जाणे हाच खरा उत्तम मार्ग आहे. या अनन्य भक्तीमुळेच जीवात्मा आणि परमात्मा यांच्या एकात्मतेचा अनुभव येतो आणि ब्रह्मप्राप्ती होते. 'भाविक विश्वासी' यांनाच संत तुकाराम महाराज वंदन करतात, असे सांगून महाराजांनी सर्व भाविकांना खऱ्या अर्थाने विश्वासाने देवाचे होण्याचा प्रेरणादायी संदेश दिला.

या पवित्र अवसरावरून एक महत्त्वाची ऐतिहासिक माहिती सांगण्यात आली, की आष्टी तालुक्यात एकूण १९ समाधी असलेले एकमेव गाव म्हणजे सांगवी पाटण. अनेक वर्षे चालत आलेला येथील भक्तीचा अखंड प्रवाह आणि धार्मिक संस्कृतीचे जतन करण्याची परंपरा या गावाला विशेष ओळख देते. सध्या येथे २० वे महंत सुदर्शन महाराज आहेत, तर २१ वे महंत काशिनाथ महाराज शास्त्री यांची महंतपदी नियुक्ती झालेली आहे.

या कीर्तन समारंभाला श्रीक्षेत्र सांगवी पाटण आणि पंचक्रोशीतील भाविक भक्तांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. भक्तिभावाने केलेल्या कीर्तनाने सर्वांचे मन पावन झालेले दिसून आले.





# वडवणीचे समुद्र विज्ञान शास्त्रज्ञ डॉ. विलास फरताडे यांचा सत्कार

## संशोधनासाठी दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्थेत निवड

वडवणी : अशोक फपाळ

वडवणी येथील रहिवासी असणारे व सध्या गोवा राज्यामध्ये समुद्र विज्ञान संशोधन शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असलेले डॉ. विलास भागवत फरताडे यांना नुकतीच चीन सरकारच्या चायनीज अकॅडमी ऑफ सायन्सेस यांच्याकडून प्रतिष्ठित पोस्ट डॉक्टराल फेलोशिप मिळाली आहे. त्यांच्या पुढील संशोधनासाठी त्यांची दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्थेत निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर अशाप्रकारे सर्वोच्च यश गाठणारे डॉ. विलास फरताडे हे बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील एकमेव असावेत. त्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीबध्दल त्यांचा सोमवारी वडवणी येथे मित्र परिवाराच्या वतीने गौरव सत्कार करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ. विलास फरताडे यांना नुकतीच गोव्याच्या सीएसआयआर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी येथून डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्था ही आशियातील एक अग्रगण्य सागरी संशोधन संस्था आहे. येथे आधुनिक प्रयोगशाळा प्रवाळ संवर्धनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि बहुविषयक संशोधन सुविधा उपलब्ध आहेत. ही संस्था सागरी जीवनाचे संरक्षण व अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळखली जाते. डॉ. विलास फरताडे यांचे संशोधन प्रवाळांच्या आरोग्यावर केंद्रित आहे. प्रवाळ हे किनाऱ्यांना नैसर्गिक संरक्षण देतात. वादळ आणि लाटांपासून त्यांना सुरक्षित ठेवतात. समुद्रातील हवामान संतुलित ठेवतात आणि माणसांच्या जीवनासाठी आवश्यक सागरी संसाधन टिकवतात. जर प्रवाळच नष्ट झाले तर पाणी, हवामान आणि माणसाच्या रोजच्या उपजीविकेवर यांचा गंभीर परिणाम हा होवू शकतो. आज हवामान बदल आणि प्रदूषण यासारख्या कारणांमुळे प्रवाळ हे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जो मानवी जीवनासाठी सर्वात मोठा धोकादायक इशारा आहे. डॉ. विलास फरताडे याच प्रवाळांवरील ताण लवकर ओळखण्यासाठी नविन पध्दत विकसीत करत आहेत. मागील अनेक काळापासून यावर त्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास सुरु असून संशोधन केले जात आहे. या पध्दतीमुळे प्रवाळभित्ती वाचवण्यासाठी वेळेत उपाययोजना करता येतील आणि समुद्री परिसंस्था तसेच मानवी उपजीविका सुरक्षित राहतील. दरम्यान या प्रकल्पामुळे भारत-चीन दरम्यान सागरी विज्ञानातील संशोधनाला नवे बळ मिळणार असून प्रवाळ संवर्धनाच्या नवकल्पनांना जागतिक स्तरावर चालना मिळणार आहे. ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि भारत देशासाठी मोठी अभिमानाची बाब असणार आहे. डॉ. विलास फरताडे यांच्या या यशाबध्दल त्यांचे दि. ६ ऑक्टोबर २०२५ सोमवार रोजी स्वस्तिक ज्वेलर्स याठिकाणी मित्र परिवार यांच्या वतीने गौरव सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चंद्रकांत आप्पा जैन, भागवतराव फरताडे, अर्जुन जाधव, माने मामा, नितीन जैन, दिपक जैन, डॉ. शंकर वाघ, ज्ञानेश्वर वाव्हळ, शहादेव लोंढे, सचिन काटे, अशोक बहिरे, निलेश जैन, प्रा. ओमप्रकाश जाधव, संदिप शिंदे, विनोद गार्डी, वैजनाथ तोगे, तेजस सदरे, वसूवैभव जाधव, यांसह आदींनी अभिनंदन करुन त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



## अभिजात मराठी भाषेमुळे सांस्कृतिक वारशांचे जतन होईल : प्रा. चाटे

● पान १ वरून... अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. सी. वारभुवन होते. मंचावर प्रा. एस. ए. बटुळे, प्रा. बी. के. मुंडे, प्रा. के. एच. सय्यद आदी सह उपस्थित होते. प्रारंभी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थिनींनी पाहुण्यांचे स्वागत गीताने स्वागत केले. प्रा. चाटे पुढे म्हणाले, मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी आणि संवर्धन होण्यासाठी अभिजात मराठी भाषा या अनुषंगाने जनसामान्यांमध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी हा उद्देश आहे. यामुळे संशोधन व जनजागृती होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अभिजात मराठी भाषेमुळे सांस्कृतिक वारशांचे जतन होईल. आर्थिक अनुदान आणि त्यामुळे सहाजिकच भाषेच्या विकासाला गतीही मिळेल असे सांगून ते पुढे म्हणाले, साहित्यिक आणि संशोधनाला चालना मिळेल. एवढेच नव्हे तर जागतिक स्तरावर ओळख होण्यासाठी ही उपयोग होईल. दरम्यान, विद्यालयात तज्ञ व्यक्तींची व्याख्याने चर्चासत्रे परिसंवाद कार्यशाळा शिबिरे आदी सह मराठी ग्रंथांची ओळख व्हावी यासाठी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा आणि सुंदर हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. प्रस्ताविक प्रा. बी. के. मुंडे यांनी; सूत्रसंचालन आर. के. खेडकर तर डी. एस. तळेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## अभिजात दर्जा मिळाल्याने ग्रंथालये सशक्त होतील!

मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून राज्यभर तीन ऑक्टोबर हा अभिजात मराठी भाषा दिवस; तर नऊ ऑक्टोबर पर्यंत अभिजात मराठी भाषा सप्ताह विविध उपक्रमांनी संपन्न होत आहे. जनसामान्यांमध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी आणि संशोधन, जनजागृती या अनुषंगाने मराठी भाषेच्या सर्वांगीण प्रगती व विकासासाठी हा सप्ताह फलदायी ठरेल!' असे मत प्रमुख व्यक्तींनी भाषणा दरम्यान व्यक्त केले.

## पैठण तालुक्यात दारू बंदी अधिकाऱ्यांच्या हप्ते खोरीमुळे अवैध्य दारू आड्डुयात वाढ?

● पान १ वरून... मार्फत मलिदा घेवून जायचे हे निती नियमाचे झाले आहे. जर दारू बंदी अधिकारी हप्ते घेत नसते तर गावागावात इतक्या राजरोसपणे अवैध दारू विक्री करण्याची कोणाची हिंमत झाली नसती हे कोणीही सांगेल त्यामुळे वरिष्ठ पातळीवरील जो पर्यंत एखादा खमक्या कर्तव्यदक्ष अधिकारी या हप्ते खोरीला वेसण घालत नाही तोपर्यंत तालुक्यात ठिकठिकाणी बोकाळलेले अवैध दारूचे अड्डे बंद होणे शक्य नाही असे तालुक्यातील सुज्ञ नागरिकांचे मत आहे.

# धारूर येथे वंचित बहुजन आघाडीच्या विराट जन आक्रोश मोर्चा मध्ये सामील व्हा - प्रशांत उघडे

➤ माजलगाव : प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी धारूर तालुक्याच्या वतीने विविध जनतेच्या हक्कांसाठी आणि शासनाच्या दुर्लक्षाविरोधात "विराट जन आक्रोश मोर्चा" बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण सर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली होणार आहे.

या मोर्चात तालुक्यातील सर्व समाजघटक, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि बहुजन समाज मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. जनतेच्या विविध ज्वलंत मागण्या शासनापर्यंत



पोहोचविण्यासाठी आणि प्रशासनाच्या निष्क्रीय भूमिकेविरोधात हा मोर्चा काढण्यात येत आहे. या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिकांनी सामील व्हावे अशी आवाहन वंचित बहुजन आघाडीचे तालुकाधक्ष प्रशांत उघडे यांनी केले आहे. या मोर्चा मध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून कार्यक्रमात अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यात मा. शैलेश कांबळे (जि. अध्यक्ष वं. ब. आ. बीड) मा. मिलिंद घाडगे (महासचिव वं. ब. आ. बीड) मा. सचिन उजगरे (उपजिल्हाध्यक्ष वं. ब. आ. बीड) मा. बाबुराव मस्के (युवक जिल्हाध्यक्ष वं. ब. आ. बीड) मा. अण्णा मस्के, (जिल्हा उपाध्यक्ष पूर्व), मा. धम्मानंद कासारे (जिल्हा उपाध्यक्ष पूर्व), मा. बिभिषण चाटे (युवक जिल्हा सचिव, बीड) हे सर्व मार्गदर्शक व नेतृत्व करणारे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून विष्णू तुपसागर (ता. अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा), कैलास साळवे (ता. महासचिव भारतीय बौद्ध महासभा) किशोर वाव्हळकर, अशोक पौळ (ता. अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी) धम्मानंद साळवे ज्येष्ठ नेते माजलगाव, अंकुश जाधव ज्येष्ठ नेते माजलगाव, भारत तांगडे (जिल्हा उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी), विनोद काकडे युवक ता. अध्यक्ष वडवणी, प्रकाश उजगरे युवा नेते वडवणी, हे उपस्थित राहणार आहेत.

**मोर्चाला मिळत आहे जनतेचा प्रतिसाद :**

धारूर तालुक्यातील विविध भागांमधून कार्यकर्त्यांनी जनजागृती मोहिमा सुरू केल्या असून, मोर्चाला प्रचंड जनसमर्थन मिळत आहे. विविध सामाजिक संघटना, महिला बचतगट, विद्यार्थी संघटना आणि शेतकरी संघटनांनी देखील या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा प्रशासनाला जाग आणणारा ठरणार असल्याचे स्थानिक पदाधिकारी सांगत आहेत.

### या मोर्चात मांडण्यात येणाऱ्या काही प्रमुख मागण्या अशा आहेत

१. शेतकऱ्यांना तत्काळ अतिवृष्टी अनुदान ५० हजार रुपये द्या. २. कसत असलेले गायरन गायरन धारकांच्या नावे करून ७/१२ वाटप करा ३. आदिवासी समाज बांधवांचे प्रलंबित जात प्रमाणपत्र तत्काळ द्या. ४. दलित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समाजांच्या मूलभूत सुविधांवर भर द्यावा. ५. गावपातळीवरील विकासकामांमध्ये पारदर्शकता आणावी. ६. अन्यायग्रस्त कुटुंबांना न्याय मिळावा, यासाठी प्रशासनाने सक्रिय भूमिका घ्यावी. ७. रमाई आवास, प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रलंबित फप्ते तत्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करा. - या जनआक्रोश मोर्चाच्या आयोजनात स्थानिक नेते व कार्यकर्त्यांचा पुढाकार असून, तालुकाध्यक्ष इंजी. प्रशांत उघडे, राणबा उजगरे शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे अभिजीत वाव्हळ, कपिल उजगरे, अमोल बनसोडे, नवनाथ गवळी, बाळासाहेब उजगरे यांच्यासह अनेक तरुण कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला आहे. - सदरील मोर्चा हा धारूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघून तहसील कार्यालयावर धडक देणार आहे.

# महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| कु | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

विशेष



# भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या केज शहराध्यक्षपदी अक्षय हजारे यांची निवड

**केज : प्रतिनिधी**

भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या केज शहराध्यक्षपदी अक्षय हजारे यांची निवड झाल्याबद्दल मित्रपरिवाराच्यावतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या केज शहराध्यक्षपदी अक्षय हजारे यांची निवड झाल्याची बातमी मित्र परिवाराला कळताच मित्र परिवाराच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी करून पेढे भरून आनंद उत्सव साजरा केला. सतकाराला उत्तर देताना नवनिर्वाचित शहराध्यक्ष अक्षय हजारे म्हणाले की, भविष्यामध्ये भ्रष्टाचार विरोधी लढ्यामध्ये जास्तीत जास्त लोकांना सामील करून संघटनेची ताकद वाढवून गोरगरीबावर होणारे अन्याय आणि शासकीय कार्यालयात झालेला भ्रष्टाचार हा नि:पक्षपातीपणाने उघडकीस आणून भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे प्रामाणिकपणे काम करून शोषित, वंचित, पीडित व बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम करील असा विश्वास मित्र परिवाराला सत्काराच्या कार्यक्रमात बोलताना अक्षय हजारे यांनी दिला आहे.

यावेळी लखन हजारे, धीरज मस्के, प्रतीक मस्के, हर्षद मस्के, मनोज मस्के, प्रदीप हजारे, सुमित मस्के, सुरज मस्के, शुभम आरकडे, पप्पू वाघमारे, पियुष जानवे यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होते. निवडीबद्दल सर्व स्तरातुन अक्षय हजारे यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



# जिल्हा परिषद (अनु) माध्यमिक शाळा धामणगाव एक आदर्श शाळा

**आष्टी : प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील जि.प.(अनु) माध्यमिक शाळा एक आदर्श शाळा म्हणून पुढे येत आहे. स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेने या शाळेचा उपक्रमशिल आणि आदर्श शाळा पुरस्कार माजी मंत्री आमदार सुरेश(आण्णा) धस यांच्या शुभहस्ते देवून नुकताच गुणगौरव केला आहे.

शाळेचे अनेक विद्यार्थी विविध शालेय स्पर्धा परीक्षेत तसेच क्रिडा स्पर्धांमध्येही यशस्वी झाले आहेत. विविध शालेय स्पर्धा निबंधस्पर्धा, भाषण, रांगोळी, चित्रकला, मैदानी स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम तसेच "बालविवाह एक अभिशाप" हे पथनाट्य सादर करून विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

गेल्या पाच वर्षात एन.एम.एम.एस परीक्षेत ६० विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले त्याचबरोबर इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षेतही १५ पेक्षा जास्त विद्यार्थी पात्र झाले आहेत. स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातुन जवळपास २५ लक्ष निधी विद्यार्थ्यांना मिळाला आहे. शाळेत ज्ञानार्जन केलेले अनेक विद्यार्थी राज्य स्पर्धा परीक्षा एम.पी.एस.सी, वैद्यकिय आणि अभियांत्रिकी क्षेत्रातही यश संपादन करत आहेत. इयत्ता दहावीच्या निकालातही दरवर्षी शाळेला उल्लेखणीय यश प्राप्त होते.

शाळेच्या उल्लेखणीय यशाबद्दल संजय गाढवे, गावचे सरपंच मनोज गाढवे, उपसरपंच सतिश झिंजुर्के सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप तरटे व सर्व सदस्य, मुख्याध्यापक हिरामन पोकळे, सर्व ग्रामस्थ व पालकांनी शिक्षकांचे अभिनंदन केले. शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानोबा जायभाये, राजकुमार मोरे, शैलेंद्र शरणांगत, विकास पालवे, श्रीमती. मनिषा होळकर, अमोल झिंजुर्के, बैयस मॅडम यांचे अनमोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभते.

# नगराध्यक्ष पदासाठी ओबीसी महिला आरक्षण जाहीर

## माजलगाव नगरपरिषद महिला ओबीसी साठी

**माजलगाव : प्रतिनिधी**

आगामी नगरपरिषद निवडणुकीत माजलगाव नगरपरिषद नगराध्यक्षपदासाठी ओबीसी महिला आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत माजलगाव नगरपरिषदेत 'महिलाराज' पाहायला मिळणार आहे.

गेल्या काही काळापासून नगराध्यक्ष पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होणार याबाबत सर्वसामान्यांपासून ते राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता होती. अखेर आज जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीनुसार नगराध्यक्षपद ओबीसी (महिला) प्रवर्गासाठी राखीव ठरले आहे.

या निर्णयामुळे राजकीय समीकरणांमध्ये उलथापालथ होणार असून अनेक सर्वसामान्य महिला नेत्यांना संधी उपलब्ध झाली आहे. विविध पक्षांतील कार्यकर्त्या, सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या महिला तसेच नवोदित चेहऱ्यांमध्ये उमेदवारीसाठी चुरस निर्माण झाली आहे. नगरपरिषदेत नहिलांचा वाढता सहभाग है समाजातील सकारात्मक बदलाचे द्योतक ठरणार असून, प्रशासनात महिलांचे नेतृत्व ठसवणारे हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

या वेळी नगरपरिषदेवर कोणत्या ओबीसी महिला नेतृत्वाचा झेंडा फडकतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. तर दुसरी कडे आज असलेली




भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी युती आगामी नगर परिषद च्या निवडणूकात राहील की नाही हे निश्चित झाले नाही तर इच्छुक उमेदवार वरील पक्षाची युती राहावी म्हणून देव पाण्यात ठेवत आहेत जर युती झालीच तर भाजप शिवसेना की राष्ट्रवादी या पैकी कोणाचा उमेदवार राहील हे अजून निश्चित झाले नाही आमदार म्हणून प्रकाशदादा सोळंके जो उमेदवार देतील तो एकंदरीत विकास कामावरून सरस राहू शकतो

# फळरोप वाटिका मजुरांचे जिल्हा अधिकक्षक कृषी अधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू

**माजलगाव : प्रतिनिधी**

कृषि अधिकारी कृषि चिकित्सालय फळरोप वाटिका व तालुका बीजगुणन केंद्र येथील दैनंदिन रोजंदारी मंजूरी माहे ऑगस्ट २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीत थकीत मजूरी आज पर्यंत मिळालेली नसल्याने तसेच माहे जून २०२४ ते ऑक्टोंबर २०२४ पर्यंत मजूरी सुध्दा आजतागायत मिळालेली नसल्याने फळरोप वाटिका मजुरांनी काल पासून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड यांच्या कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

सदरील उपोषण कर्त्यांचे म्हणणे आहे की, आम्ही घरामध्ये कर्ता असल्याने कूटूंबाची सर्वस्वी जवाबदारी आमच्यावर आहे. उदा. मुलाबाळाचे शिक्षण, आई-वडिल वयस्कर असल्याने त्यांना वेळोवेळी दवाखाना व औषधी उपचाराची आवश्यकत्ता असते घरामध्ये आडी-आडचणीचा सामना करणे. जिक्रीचे झाले असून आमच्यावर उपाषमारीची वेळ आलेली आहे. तरी विनंती की आमच्या हक्काचे वेतन मिळवून द्यावे.

या पुर्वी मा. कृषि आयुक्तालय पुणे







व मा. विभागीय कृषि सहसंचालक संभाजीनगर, मा. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड, मा. उपविभागीय कृषि अधिकारी माजलगांव तोंडी व लेखी कळवूनही त्यांनी आजतागायत आमच्या थकीत वेतनाबाबत. दखल घेतलेली नाही. त्या मुळे आम्ही गणेश थोरात, तुंकाराम निसर्गध व मंहानदाबाई नवले आदींनी आजपासून हे उपोषण सुरू केले आहे.

# माजलगावातील पूरग्रस्तांसाठी सामाजिक बांधिलकीतून मदतीचा हात

## महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कर्मचारी संघटनेचा पुढाकार



**माजलगाव** : महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कर्मचारी संघटना मुंबई यांच्या माध्यमातून तालुक्यातील सुरूमगाव, शु. निमगाव, मोगरा, डाके पिंप्री, खतगव्हाण, सांडस चिंचोली येथील पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू व शालेय साहित्य किटचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर आयुक्त, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार संतोष रुईकर यांच्या प्रेरणेतून वस्तू व सेवा कर संघटनेचे अध्यक्ष संजय मंडले, सरचिटणीस अजित भोसले यांच्या संकल्पनेतून व मास्टर ट्रेनर आपत्ती व्यवस्थापन डॉ. राजकुमार राठोड, सहशिक्षक जालिंदर साबळे, सहशिक्षक ज्ञानेश्वर पवार यांच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकीतून सात लक्ष रुपये किंमतीच्या सुमारे ४०० अन्नधान्य, जीवनोपयोगी वस्तू व शालेय साहित्य कीटचे वाटप पूरग्रस्त कुटुंबांना करण्यात आले. पूरग्रस्त कुटुंबीयापर्यंत मदत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागातील अधिकारी व कर्मचारी सुभाष लवटे, विजय मोरे, अनिल चव्हाण, प्रवीण बहिर, विशाल वाघ, पांडुरंग गर्जे, प्रमोद कामकर, रामेश्वर आहेर, अरुण गायकवाड, बळीराज, दशरथ जानकर, दत्ता बर्वेकर, हरी गोल्हार, कृष्णा अंभोरे, मयूर खामकर, दत्ता माने, निखिल पवार, सचिन जाधव, विजय सोनवणे, भावेश सोनवणे इत्यादी अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# फाईव स्टार बिझनेस फायनान्स शाखेचे उद्योगपती तुकाराम सोळंके च्या हस्ते उदघाटन



**माजलगाव** : येथे फाईव स्टार बिझनेस लि. शाखेचे उदघाटन दि.४ आक्टोंबर शनिवार रोजी येथील प्रसिद्ध उद्योगपती तुकाराम सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय शाखा अधिकारी नागनाथ सुरनर, रफीक शेख, शाखाधिकारी भारत पास्टे, सर्व शाखेचे कर्मचारी व तालुक्यातील शेतकरी, व्यवसाईक, दुकानदार यांची मोठी उपस्थिती होती. मराठवाड्यात फायनान्स फाईव स्टार बिझनेस फायनान्स लि.ने अनेक नवीन शाखा उघडल्या असून, कंपनी आपले नेटवर्क विस्तारत आहे. कंपनीने गेल्या काही वर्षांत शाखांची संख्या वाढवली आहे. या फायनान्स मध्ये कर्जासाठी लागणारी प्रक्रिया सोपी आहे. याचा शहरासह ग्रामिण भागातील नोकदार, शेतकरी, छोट्या व मोठ्या व्यवसाईकांना मोठा फायदा होणार असल्याचे शाखाधिकारी भारत पास्टे यांनी उदघाटन प्रसंगी बोलताना सांगीतले.

# मनुरवाडी गावच्या ग्रामसेवकास निलंबीत करा

## गटविकास अधिका-यांकडे गावकऱ्यांची मागणी

**माजलगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मनुरवाडी गावचे ग्रामसेवक यांनी गावातील तरूणांना शिवीगाळ केल्याप्रकरणी ग्रामसेवकावर कडक कारवाई करून निलंबन करा अशी मागणी गटविकास अधिकारी यांचेकडे ग्रामस्थांच्या वतीने निवेदनाव्दारे करण्यात आली.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. ५ ऑक्टोबर रविवारी रात्री १२ वाजता गावातील मंदिरासमोर येत ग्रामसेवकाने रात्री बारा वाजता अतिषबाजी केली. याबाबत गावातील नागरिकांनी, तरूणांनी विचारणा केली असता मुकुंद पवार, गणेश



जाधव, योगेश पवार या तरुणांसह ग्रामस्थांना शिवीगाळ केली. त्यामुळे अशा हुल्लडबाज ग्रामसेवकावर कडक कारवाई करा व पदावरून निलंबीत करावे अशी मागणी ग्रामस्थानी गटविकास अधिका-यांकडे निवेदनाव्दारे केली असुन निवेदनावर मुकुंद पवार, गणेश जाधव, योगेश पवार, ऋषिकेश शिंदे, कैलास शिंदे, विशाल पवार, नितीन थोरात, शहाजी पवार, गणेश थोरात, अमोल पवार, भिम थोरात, अतूल पवार, बापू श्रिखंडे, महेश शिंदे योगेश शिंदे, अनंता जगताप, भागवत हरकाळ, सुरेश ढगे यांच्या स्वाक्ष-या आहेत.

# गायरान जमीन हक्क परिषदेसाठी कन्नडमध्ये उत्साह; रिपब्लिकन पार्टीच्या बैठकीत तयारीला वेग

**कन्नड : संतोष खाजेकर**

येणाऱ्या 12 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या भव्य गायरान जमीन हक्क परिषदेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आज कन्नड येथील शासकीय विश्रामगृहात रिपब्लिकन पार्टीच्या पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत पक्षातील वरिष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीला रिपब्लिकन पार्टीचे प्रदेशाध्यक्ष बापुराव कदम, जिल्हाध्यक्ष बालकृष्ण इंगळे, विजय मगरे, उपाध्यक्ष रमेश दाभाडे, मराठवाडा उपाध्यक्ष दिलीप पाडमुख, मराठवाडा सेक्रेटरी अरविंद अवसरमल, सूर्यकांत पठारे, तसेच भारतजी, जिल्हा संघटक विशाल सोनवणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनिल खंदारे, देवा लोखंडे, गणेश अंभोरे, विजय लोखंडे, संतोष साबळे, बाळू भाऊ यांनी पक्षात प्रवेश करून रिपब्लिकन पार्टीच्या विचारधारेवर विश्वास दर्शविला.



त्यांच्या प्रवेशामुळे पक्षाची ताकद आणखी वाढल्याचे नेत्यांनी सांगितले. प्रदेशाध्यक्ष बापुराव कदम यांनी आपल्या मोलाच्या मार्गदर्शनात सांगितले की, गायरान जमिनीवरील हक्क हा ग्रामीण जनतेचा मूलभूत अधिकार आहे. या हक्कासाठी रिपब्लिकन पार्टी रस्त्यावर उतरणार असून, 12 ऑक्टोबर रोजीची परिषद ही ऐतिहासिक ठरणार आहे. शासनाने भूमिहीनांना न्याय देण्यासाठी ठोस धोरण आखावे, हीच आमची मागणी आहे. जिल्हाध्यक्ष बालकृष्ण इंगळे यांनी सांगितले की, ही परिषद केवळ बैठक नसून, शेतकरी, भूमिहीन आणि वंचितांच्या न्यायासाठीचा मोठा लढा आहे. सर्व कार्यकर्त्यांनी गावागावात जनजागृती करून मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद अवसरमल यांनी केले, तर आभार प्रदर्शन विशाल सोनवणे यांनी मानले. बैठकीत गायरान जमिनींच्या सर्वसमावेशक धोरणासाठी मागण्या सविस्तर मांडण्यात आल्या आणि शासनाने तातडीने लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले या बैठकीच्या माध्यमातून 12 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या भव्य गायरान जमीन हक्क परिषदेच्या तयारीला जोर मिळाला असून, मराठवाडा परिसरातून कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे.

# गुंड निलेश घायवळच्या घरावर धाड, पोलिसांच्या हाती लागलं घबाड

पुणे : कोथरुडमधील गोळीबार प्रकरणात पोलिसांनी गुंड निलेश घायवळ विरोधात मकोका अंतर्गत गुन्हा नोंदवला. पण पोलीस कारवाई होण्याआधीच निलेश घायवळ फरार झाला. तो परदेशात असल्याचे वृत्त आहे. घायवळ फरार झाल्याचे कळल्यानंतर पोलिसांनी घायवळच्या पुण्यातील घरावर धाड टाकली. या कारवाईत पोलिसांच्या हाती मोठे घबाड आले आहे. संघटीत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी घायवळविरुद्ध सर्व आघाड्यांवर कारवाईचा फास आवळला आहे.

पुणे पोलिसांच्या विशेष पथकाने निलेश घायवळच्या कोथरुडसह पुण्यातील विविध ठिकाणांवरील घरांवर धाड टाकली आहे. या कारवाईत पोलिसांनी बंदुकीच्या जिवंत गोळ्या, रिकाम्या पुंगळ्या, अनेक महत्त्वाची कागदपत्रे यांची जप्ती केली. जप्त केलेल्या कागदपत्रांमध्ये घायवळच्या मालकीच्या मालमत्तांचे सातबारे, साठेखत, तसेच मराठवाड्यातील पवनचक्की प्रकल्पाशी संबंधित फाइल्स सापडल्या आहेत. पोलिसांनी घायवळच्या बेकायदेशीर बांधकामे आणि मालमत्तांविरोधात कारवाईसाठी पुणे महानगरपालिकेला अधिकृत पत्र पाठवले आहे.

महापालिका प्रशासनाने कारवाईसाठी आवश्यक ती कायदेशीर तयारी सुरू केली आहे. अनधिकृत मालमत्ता आणि थकीत कर असलेल्या संपत्तीवर सील आणि जप्तीची प्रक्रिया हाती घेतली जाणार आहे.

आतापर्यंतच्या तपासातून हाती आलेल्या माहितीनुसार निलेश घायवळने बनावट कागदपत्रांच्या आधारे पासपोर्ट मिळवून विदेशात पलायन केले आहे. पुणे पोलिसांनी घायवळचा पासपोर्ट रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच घायवळच्या नावावरील बँक खाती गोठवण्याचे आणि बेकायदा मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत.

# सुरेंद्र जव्हेरी यांना मातृशोक

**माजलगाव : प्रतिनिधी**



बीड जिल्हा गृहरक्षक दलाचे जिल्हा केंद्र नायक सुरेंद्र जव्हेरी यांच्या मातोश्री शांताबाई शंकरसिंग जव्हेरी यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८६ व्या वर्षी सोमवार रोजी सकाळी ८ वाजता निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी अमरधाम स्मशानभूमी येथे दुपारी दोन वाजता शोकाकुल वातावरणात करण्यात आला असून त्यांच्या पश्चात मोहनराव व सुरेंद्र असे दोन मुले नातवंडे आहेत. अंत्यविधी वेळी प्रशासकीय अधिकारी प्रकाश बताडे व सर्व स्टाफ आणि जिल्ह्यातील सर्व तालुका समादेशक व सर्व पलटण नायक डॉक्टर वकील प्रतिष्ठी त व्यक्ती आवर्जून उपस्थित होते. पत्रकार व प्लांटून कमांडर बाबासाहेब कुलथे परिवार श्री जव्हेरी यांचे दु:खा त सहभागी आहे.

**डॉ. गणेश ढवळे** ➤ नगरपरिषदेने राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक वापरावर प्रतिबंध घाला

# छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणाच्या दुरावस्थेविरोधात सत्याग्रह आंदोलन

**बीड : प्रतिनिधी**

बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण हे शहरातील क्रीडाप्रेमी आणि नागरिकांसाठी महत्त्वाचे केंद्र असले, तरी सध्या हे मैदान पूर्णपणे दुरावस्थेत गेले आहे. मैदानात अस्वच्छता, वाढलेले गवत, गुरे चरणे, स्वच्छतागृहांची दुरवस्था, तसेच क्रिडांगणाचा वापर खेळांऐवजी राजकीय, सामाजिक व व्यावसायिक कार्यक्रमांसाठी होत असल्याने मैदानात चिखल आणि वाहनांच्या खोल खुणा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सकाळी व सायंकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तसेच क्रीडांगणातील ओपन जिममधील साहित्य तुटलेले आणि निष्क्रिय झाले असून, त्याकडेही नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे मैदानाची स्वच्छता, सुरक्षारक्षकांची नेमणूक आणि जिम उपकरणांची दुरुस्ती या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

आंदोलनानंतर नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या माध्यमातून





सत्याग्रह आंदोलन

या सर्व मागण्यांसाठी आणि क्रीडांगणाच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०६ ऑक्टोबर, सोमवार रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण परिसरातील महात्मा गांधी स्मारकासमोर "सत्याग्रह आंदोलन" करण्यात आले. या आंदोलनादरम्यान क्रीडांगणाचा राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक वापरावर कायमस्वरूपी बंदी घालावी, तसेच मैदानाचे संवर्धन आणि संरक्षणासाठी सुरक्षारक्षक नेमावा अशी ठोस मागणी करण्यात आली.

मुख्यमंत्री, पालकमंत्री आणि क्रीडामंत्री यांना निवेदन देण्यात आले. प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन क्रीडांगणाचे पुनर्वसन व दुरुस्ती कार्य हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी आंदोलनात प्रा. डी.जी.तांदळे मार्गदर्शन बीड शहर बचाव मंच, अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी, रामधन जमाले, जिल्हाध्यक्ष (इंटक), नितीन सोनावणे जिल्हाध्यक्ष आल इंडिया पँथर सेना बीड, नितिन जायभाये, अध्यक्ष बीड शहर बचाव मंच, सखाराम बेंगडे, सचिव (इंटक), शेख मुबीन, शेलार शिवशर्मा, शेख मुस्ताक माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ आदींनी सहभाग घेतला.